म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६०८



REFBK-0026123
REFBK-0026123

# प्रार्थना दयाघना

ना.धों. महानोर

संदर्भ कार्य
२६०८
२६१२३
२२।५।९०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०८
२६१२३
कार्य २२।५।९०

# प्रार्थना दयाघना

## ना. धों. महानोर यांची इतर पुस्तके

### कवितासंग्रह :

रानातल्या कविता
वही
पावसाळी कविता
पळसखेडची गाणी
अजिंठा

### कादंबरी :

गांधारी

### कथासंग्रह :

गपसप
गावातल्या गोष्टी

# प्रार्थना दयाघना

(सहा मोठ्या कविता)

ना. धों. महानोर

REFBK-0026123

REFBK-0026123

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

प्रार्थना दयाघना
(म-७०७)
पॉप्युलर प्रकाशन

PRARTHANA DAYAGHANA
(Marathi Poems)
Na. Dho. Mahanor

© सौ. सुलोचना महानोर

पहिली आवृत्ती : १९९०/१९९१

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४.

मुद्रक
के.व्ही. गोपालकृष्णन
असोसिएटेड ॲडव्हर्टायझर्स ॲन्ड प्रिन्टर
५०५–ताडदेव ऑर्थर रोड
मुंबई-४०० ०३४

अक्षर छाया जुळणी
कॅलिकॉम्प फोटोटाइपसेटर्स
चरई ठाणे-४०० ६०१.

कवितेवर मनस्वी प्रेम करणाऱ्या
सौ लैला व रामदास भटकळ
आणि
सौ. भारती व हृदयनाथ मंगेशकर
यांना –

या संग्रहातील काही कविता ज्यांच्या
आग्रहामुळे कागदावर उतरल्या
त्या
कै.राम आपटे, कलेश सोनवणे, निळू फुले,
विनायक पाटील, दादा नेवे, बाबा भांड,
भय्या (श्रीपाद) पवार, प्रताप बोराडे
आणि सौ. शरदिनी डहाणूकर
यांचे ऋण शद्बांपलिकडचे आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०८
26923
काव्य

'रानातल्या कविता', 'वही', 'पावसाळी कविता', 'अजिंठा' असे माझे चार कवितासंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. 'प्रार्थना दयाघना' ह्या नव्या कवितासंग्रहामध्ये सहा मोठ्या कविता आहेत. पैकी 'नक्षत्रांमागून नक्षत्रं सरतात' ही कविता 'पावसाळी कविता' ह्या संग्रहात अपूर्ण होती, ती ह्या कवितासंग्रहात संपूर्ण घेतली आहे. त्याशिवायच्या नव्या पंचवीस कविता 'पक्षांचे लक्ष थवे' या ह्याच्या बरोबरीनं प्रकाशित होणाऱ्या कवितासंग्रहामध्ये आहेत.

गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये पाऊसपाणी, निसर्ग खूप बदलला. पाण्याशिवायचे सलग दुष्काळ पडले. देशात व महाराष्ट्रात घोर दुष्काळी वणव्यानं माणसं, शेतीबाडी, पीकपाणी राज्यकर्ते सगळं काही छिन्न-भिन्न करून टाकलं. शेतीच्या उत्पन्नाशिवाय उध्वस्त खेड्यांची झालेली मोडतोड कित्येक वर्षे भरून निघणं कठिण आहे. ह्याची झळ महागाई वाढल्यानं शहरी मध्यम वर्गातल्या लोकांना लागल्यानं. त्यांचं जीवनही त्रस्त झालं. निसर्गाइतकीच इथली सगळी समाजव्यवस्था व राज्यकर्ते वर्ग, शासन त्यांचे तकलादू, दूरदृष्टी नसलेले निर्णय हेसुद्धा ह्या स्थितीला कारणीभूत आहेत. आत्यंतिक स्वार्थी व भ्रष्ट झालेल्या बहुसंख्य समाजव्यवस्थेत समाजजीवनात सामान्य माणसांची होरपळ झाली. छोट्यामोठ्या सिंहासनावर असलेली बहुसंख्य माणसं व गरीब शेतकरी शेतमजूर, मध्यम वर्गातला माणूस ह्यांच्यातली दरी खूप

वाढत चालली. ही लोकशाही व स्वातंत्र्य आपलं नाही, आपल्यासाठी नाही असं खोलवर सामान्यांच्या मनावर रुजत जावं, ही काही फारशी चांगली गोष्ट नाही. त्यात पुन्हा अलिकडच्या काळात माणसा-माणसांमध्ये, जातीधर्मांमध्ये अंतर वाढत जाईल व झगडे होतील, अशा गोष्टींना खतपाणी घातलं जात आहे. साचलेल्या परंपरेतला माणूस यात अडकला हे आपण समजू शकतो पण विज्ञानयुगातल्या नव्या विचारांच्या जगतातला तरुण सुशिक्षित ह्यात नको – त्या – पद्धतीनं अडकलेला आहे. म्हणून औरंगाबादला धर्मवेडेपणानं व अतिरेकी कडव्या हिंदू व मुस्लिम जातीयवादी शक्तींनी राक्षसी हत्याकांड घडवून आणलं त्याचा जसा 'पंचनामा' झाला तसा हळूहळू देशभर होतो आहे. सुंदर एकसंध असा देश जातपात, धर्म, प्रांत, देव, दर्गा, सुवर्णमंदिर अशा कारणांनी दुभंगला जातो आहे ही खरी दुःखाची गोष्ट आहे.

स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी, पळवापळवी इत्यादी प्रकारांनी सोळा, अठरा, पंचवीस वर्षांच्या मुलींचे राजरोस घातपात व हत्या, खून मी समक्ष आज माझ्या खेड्यात पाहतो आहे. अशा परिस्थितीत कायदा, पोलीस व पुढारी ह्यांचा गरिबांना आधार न वाटता भीती वाटावी, अन्याय पदरी यावा ह्यापेक्षा दुःख ते कोणते ? 'गांधारी' ह्या कादंबरीमध्ये 'हौसा', 'जयवंता', 'सावित्री' ह्यांच्या रूपानं, 'गावातल्या गोष्टीं'मध्ये 'अवघड', 'अवदसा', 'सवंगडी' इत्यादी गोष्टींमधून तर स्त्रियांची अगतिकता व सामाजिक वास्तव मांडून हे दुःख मी सांगितलेलं आहे. थोडंफार पुन्हा ह्या कवितांमधून सांगितलं. हे अपूर्ण आहे ह्याची मला जाणीव आहे. संपूर्ण नीटपणे पुन्हा कोणत्या माध्यमातून लिहिता येईल ते पाहता येईल. अतिशय सुन्न व्हावं, निराश व्हावं अशी परिस्थिती असली तरीही इथल्या लोकशाहीवर व माणसांवर माझा विश्वास आहे. माझ्या मनाला, लोकांच्या मनाला कुठून तरी चांगलं काम करायला, त्यासाठी झगडा करायला बळ मिळतं, चेतना मिळते व अंधारातूनही ते 'दीपस्तंभाला' प्रार्थना करतं, सार्वभौम आभाळाला प्रार्थना करतं. समुद्रापलिकडल्या विज्ञानाला नम्र होऊन घेऊन येण्यासाठी, मानवी कल्याणासाठी. प्रार्थना करतं. व्यक्तिगत व सामूहिक जीवनातली माझी ही कविता हे दुःख ओटीपोटी घेऊन आलेली आहे. पंचवीस वर्षांत बदललं तेच खेडं वेगळ्या रूपात दिसतंय ह्याचं प्रामाणिक दुःख ती मांडते आहे.

भल्यासाठी खेड्याच्या ह्या आख्खे काही केले
भरलेल्या आयुष्याचे क्षण त्यांना दिले.
पाहिले मी माझ्यासाठी फास बांधणारे
ज्यांना माझ्या भाकरीचे अर्धे घास दिले.

खेड्याकडे चला कोणासाठी, कशासाठी
अडाण्यांच्या हाती जोर, काळीभोर काठी
त्यांच्या पडसाऊलीत लांडग्यांच्या तळ
क्षुद्र स्वार्थासाठी केली माणसं गढूळ.

कोणी मरो, तरो ह्यांच्या आसनांचा खेळ
महात्म्याच्या गाथेखाली पेटविला जाळ
ह्यांच्या करणीने सत्य छिन्नविछिन्न झाले
भर पावसात माझे गाव ओस झाले.

कुठे शोधावा माणूस रिते कोस कोस
दूर गणगोत माझे शद्बहि उदास
देवळात मंद दिवा काळोखाच्या पाशी
ओठातली ओळ गेली विझून शद्बांशी.

'रानातल्या कविता'मधला हिरवा निसर्ग, नागमोडी पाऊलवाटा, ऩिसर्गाइतकंच निर्मळ सुंदर प्रेम व शृंगार, हिरवं गोंदणं व तळ्यातलं चांदणं हळूहळू विस्कटून चाललं आहे. खेड्यातला झोपाळा, झिम्मा, ओवी, त्यातलं लोकसंगीत, त्याचं भारलेपण माणसामाणसांमधला ओला जिव्हाळा, सणाउत्सवामधला सबंध खेड्यातला एकसंध आनंदोत्सव, जातपात धर्म खूप असले तसे ते विसरून एकत्र नांदणारं सांस्कृतिक खेडं आज विस्कटून चाललं आहे. वाढत्या स्वातंत्र्यात भीती वाटून 'कुठे हे अरण्यातले राजरस्ते नेतील, नेवोत फासावरी' असलं दुःखं घेऊन ओळी येतात ह्याचं वाईट वाटतं.

नको तेवढी भावनाशीलता अजूनही असल्यानं फार मोडक्या मनःस्थितीत मी अलीकडे आहे. ह्या स्थितीत ज्या मित्रांनी आधार दिला, ह्यासंबंधी लिहितं केलं, पुन्हा

शेतीबाडीच्या, पाण्याच्या, सामाजिक उभारणीच्या कामी मला गुंतवलं त्यांचे ह्याच पुस्तकात वेगळ्या ठिकाणी आभार मानले आहेत. बालकवी माझे आवडते कवी. बालकवी जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्तानं ह्यावर्षी हे कवितेचं पुस्तक प्रकाशित होत आहे. रसिकांनी माझ्यावर, माझ्या कवितेवर खूप खूप प्रेम केलं, मला मोठं केलं. त्यामुळेच तर कविता ही माझी एकमेव मोठी शक्ती आहे. माझं गणगोत झालेल्या ह्या रसिकांचा स्नेहभाव व ऋण माझ्यासाठी शद्वांपलिकडले. ह्यातल्या कवितांची निवड, मांडणी इ. माझा मित्र प्रा. चंद्रकांत पाटील ह्यांची आहे. ज्या खेड्याशी आणि निसर्गाशी मी एकरूप झालो त्या खेड्याचं संपूर्ण विश्व ताकदीनं शब्दबद्ध करणाऱ्या व्यंकटेश माडगूळकर या आत्मीय व ज्येष्ठ व्यक्तीनं या संग्रहाचं मुखपृष्ठ आणि आतली रेखाटनं तयार केली आहेत, आणि हे मी एका परीनं माझं भाग्यच समजतो. ह्या कवितासंग्रहातल्या कवितांना 'महाराष्ट्र टाइम्स', 'सकाळ', 'साधना', 'मौज' ह्यांनी विशेष प्रसिद्धी अगोदर दिली होती. . त्यांचेही आभार !

– ना. धों महानोर

५ जाने १९९०

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना दयाघना | १ |
| २. | सुना सोन्याचा पिंपळ | २७ |
| ३. | पंचनामा | ३५ |
| ४. | दीपस्तंभ | ५१ |
| ५. | समुद्रापलिकडचा समुद्र | ५५ |
| ६. | नक्षत्रामागून नक्षत्रे सरतात | ८३ |



१.

# प्रार्थना दयाघना



## १ प्रार्थना दयाघना

ऋतुमान बदलत चालले
पाऊस पाण्याचे
पिकांचे झाडा झुडुपांचे
चैतन्य ओसरून चालले
नदीनाल्यातले पाणी
त्यातली झुळझुळ गाणी
सगळं विस्कटून दूरवर
कणसांमधले लदबदले दरवळ
हळुवार संपून चालले
संपून चालले
झाडांचे हिरवटपण तजेलदार
सोसणार नाही झाडांना भार
एवढा फळभार
दळदार मातीतला ऋतुभार

ओसरून चाललेला
भरल्या ओटीनं शेतात
हुरळून गेलेलं कोणी दिसत नाही
पेरणी झाल्यावर
घुंगरांच्या तालावर
गाणं ओठावर येत नाही
चौखूर उधळून
उन्मन झालेल्या बैलाचा खूर
मातीत रुतत नाही
आसमंत बहरून
आभाळ अंगावर यावं
असा घनभार दिवस नाही.
सुने चैतन्यहीन दिवस
काजळी पांघरून
घनदाट डोळ्यांवर
शेतीवाडीवर
झपाटून झांबळ्या
निःशब्द एकलेपणात
मोडक्या छप्परांच्या
घरादारांच्या.
पक्षी उडून जाताहेत
घरटे सोडून
दूरवर दिगंतात.
नदीचे काठ
रुतून बसलेले
कोरड्या रेताडात.
पाझर तळ्याच्या
काळपट गाळात
पानांचे देठ

रंगहीन सुकलेले काठाकाठावर
घिरघिरट्या घारींच्या
पंखांच्या सावल्या
दुपारच्या पारी.
भुकेनं मेलेल्या ढोरांसभोवार
विक्राळ पंखांची
पंखजड गिधाडं
सुन्नाट दुपारी.
फुलांचे देठ रंगहीन सुकलेले
शिवारभर संन्यस्त
ऋतुभार झाडांचे खुडून गेलेले.
डोळ्यांत उन्हाचे
भयाण कोरडेपण
फाल्गुनकाळी.
निरभ्र
मातीचे सौभाग्य लोपले
कोरड्या कपाळी.
लांबत जाणारा
दिवस उन्हाळ्याचा
वणवण बखोटा
सर्वत्र पसरल्या
पळसफुलांच्या
लालजर्द वाटा.
रानभर सुगंध नाही
लालजर्द दूरवर पेटलेली राने
मोटेवरचे दूरस्थ गाणे
एकाद्या चुकार पांगाऱ्याचे
लालजर्द बहरणे.
डोंगर झाडीत

निष्पर्ण उदासवाणे
एकाकी जिणे
मोडल्या वाटांच्या
पळस फुलांचे लालजर्द जगणे.
दिवस बदलत आहेत
झटपट वेड्यागत
वर्षापाठोपाठ
इथर बिथर भरलेले
दाणे कुठेतरी एखाद्या कणसात.
सगळ्याच शिवारात
पाचोळा, चोळामोळा
भिरंगत येणाऱ्या
भणंग संसारात.
खेड्यातले चैतन्य
संपून चालले
माणसामाणसांतले
ऋणानुबंध हळुवार
कमी होत चालले
माणसं निघून चाललेली
मोडक्या बैलगाडीत
इवलासा संसार बांधून गाठोड्यात
टिचलेल्या कंदिलागत
अधांतरी वाऱ्यावर
जथ्थ्या जथ्थ्यांनी
घरदार सोडून शहरांवर दूरच्या
ऋतुगंध संपून चालले आहेत खेड्यातले
खेडे उद्‌ध्वस्त, उदासवाणे
छिन्नभिन्न झालेले.
भयाण दुष्काळात

होरपळ झाडांना
माणसांना
वेटाळून संसारभर
आपापले सुखदुःख
चाळंवतांना पहिल्यागत
कोणी नाही पारावर.
तुकोबाचा अभंग
गळाभर गजरात
ओंकाराएवढा.
गातांना भरगच्च बुडालेला गाव
गावातली गजबज
दिसत नाही डोळ्यांना.
दिवे लागणीला
तुळशी वृंदावनाला
थरथर नाही पणतीची.
गोष्ट सांगणारी वेल्हाळ आजी
गर्दीतल्या ओट्यावर
सुरकुतलेली.
दुःखाच्या ओझ्यानं
अबोल झालेली.
दिवसाढवळ्या
उघड्या डोळ्यांनी
अत्याचार पाहणारी
जुनी अभिमानी मानी माणसं
अबोल
एकेकटी.
गावभर बोभाटा . . .
शब्द नाही कुठलाच.
पराधीन

विकलेल्या मनाची माणसं
निमूट बसलेली.
बरबटल्या बेलगाम
मस्तवाल हातांना
कोणीच थांबवू शकत नाहीत
शब्द बोलूच शकत नाहीत.
रोजंदारीवर
दिवसभर थकलेली
रात्र रात्र पाण्याला
भटकणारी बाई
पाच दहा चिमण्यांची.
तिच्या डोळ्यांत
जळणारा जाळ
गोवरीगत, गस्त घालणारं आभाळ
लालजर्द कुंकवाच्या नावानं
दारुड्या नवऱ्याचा सांभाळ.
तिच्या पापण्यांनी
कुठवर रडावं ?
कुणाच्या नावानं ?
जवळचा थारा नाही
कुठेच निवारा नाही
मरगळून गेलेल्या ऐन तारुण्यात
लदबदल्या कणसांचे
संपन्न ताटवे
खुडले ज्यांनी देखण्या हातांनी
त्यांचेच आयुष्य खुडले जात आहे
उमदेपणात, ऐन तारुण्यात.
चंद्र करपून चालले आहेत.
बाभुळवनाच्या

घनदाट काळोखात
रात्र गढंतीच्या सावटात.
पीरालगतच्या पांदीच्या रस्त्यावर
हलकासा घंटानाद.
स्मशानजोग्याच्या काळ्याकुट्ट पेहेरावात.
पिंपळानजिकच्या
पांदीच्या रस्त्यावर
रक्तात भिजलेली
लालजर्द आरोळी
पोरी झोपेत किंचाळणाऱ्या
गावकुसात मोठ्यांदा.

थरथरता कोलाहल
बाभुळवनात, थरथर घरकुलात . . .
खेडे निःशब्द निमूढ निपचित
झोपलेले अंधारात.
पांघरून घेतांना माणसं
गडीगुप्प आपापसात.
चंद्र करपून चालले
खेड्यापाड्यातले.

अंधाऱ्या रात्री
वडाच्या पारंब्या
भयभीत खोलवर.
वटवाघळांच्या
पंखांची फडफड
बारदेच्या काठावर.
डोंगरकठड्यानं
भडकत्या ज्वाला
लालचट जांभळ्या
करपल्या गवतावर

दगडांवर जळणाऱ्या
सैरभैर वाटा.
रात्रभर
वणवा वणवण भटकता
लगतच्या डोंगरावर.
गावभर कुत्र्यांचा कर्कश्श ओरडा
नजिकच्या तांड्यावर
राम दांलो भै रामचा करूण गलका
अस्पष्ट वाऱ्यावर.
टिचलेल्या काचेच्या
कंदिलाची थरथर
तांड्यातली
स्मशानभर.
रोजंदारीवर
छिन्नीतल्या जखमैतला
रक्तबंबाळ स्वर
निराधार गेलेला
बेवारस रस्त्यावर.
अंधाऱ्या रात्री
सजलेल्या वाड्यातला
लखलखाट रस्ताभर
घुंगरांच्या तालावर
गजबजल्या स्वरांचा
घुसमटता दरवळ.
निवड
कुठल्याशा खुर्चीवर
निवडीची लयबद्ध ललकारी दालनात
पैंजण तालावर
मोहाच्या प्याल्यांवर

अंधाऱ्या रात्री
भडकत्या ज्वाळा काळ्यानिळ्या डोंगरावर
उत्तररात्री
थकलेले खेडे
निमूट झोपलेले आपापल्या ओसरीवर.

स्वातंत्र्य आलं.
सुखाचं हिरवेपण
शहराला गेलं
शेतीच्या आयुष्याला
गाडगं मडकं आलं
स्वातंत्र्यात कधी काळी
धनधान्यासाठी
भिक्षापात्र घेऊन
निघालेला देश
स्वातंत्र्यातला.
स्वातंत्र्यातल्या माणसांचा.
जिवाच्या आकांतानं
बेहद्द राबताना
दगडधोंड्यात भरझाप
पाऊसपाण्यात
कातडी करपणाऱ्या
वैशाखी उन्हात
कष्ट करताना
वणवण भटकताना
नवा कोंभ रुजवताना
चिनगारीसारखा
पेटलेला कास्तकार
खेड्यातल्या रानावनात

अभिमान जपताना.
परदेशात झोळीनं
अन्नान्न मागणाऱ्या
देशाच्यासाठी
इथल्या माणसांसाठी
शेतं उभारली
माणसं उभारली
देश उभारला.
एका प्रचंड दुबळेपणात
अन्नधान्याच्या
झोळी भिरकावून दिली समुद्रात.
आज ऋतुचक्र झपाटून बदलतंय
वाहून जाणाऱ्या पाऊसपाण्याला
अटकाव नाही.
बलवत्तर कुठल्या योजना नाहीत
शेतीतल्या मालाला
कवडीमोल नाही
शेतीतल्या घामाला
शेतीतल्या श्रमाला
प्रतिष्ठा नाही.
खोलवर
समजून घेतला जाईल
असा ओलावा नाही.
सर्वदूर दुरावा वाढत चाललेला
काळसर्पागत
आपल्याच माणसांत.
निबिड काळोखात
कोरडेपण भयाण.
पक्षिणी

सुगरिणी खोपा सोडून
निघून चाललेल्या
पिलांना सोडून
खोप्याच्या खुणा
फांदीफांदीवर, ओसाड विहिरींवर
चोचीतल्या विरल्या
गाण्यातली गुणगुण
अजूनही रानावर.
ह्या खडतर दिसांना
चिडी पाखरांना
माणसांना सुखाचा किनारा नाही.
उभं राहावं असं डोळ्यांपुढं दिसत नाही.
किती रडावं
किती ओरडावं
कंठशोष करून ?
शब्द फाटून गेले
वाऱ्यावर विरघळले
कुठेच शब्दांना पडसाद नाही.
वाटून गेलेल्या झाडांसारखं
निष्पर्ण जगताना
कुणाला सांगावं
इथल्या लक्तरांचं दारुण कलेवर
पडीक जमिनींचे लिलाव करा फार तर.
सगळेच गहाण इथले
अब्रूसकट गावभर.
घरं दारं जनावरं शेतीचा भार
हवाली करून निघाले
देशोधडी दरियापार
निघत नाही इथल्या मातीतून पाय

हे कुणाला सांगावं
कसं सांगावं
खेड्यातल्यांना इथल्या
कोणीच नाही आपलं
हे काळजातलं दुःख
पोखरून टाकणारं अंतर्यामी.
इथल्या स्वातंत्र्यात
असल्या राज्यात
मतांचे भिक्षेकरी
आता साळसूद राहिले नाहीत.
त्यांच्या ऐश्वर्यात
त्यांचं सिंहासन
त्यांना लखलाभ असो
पाच पिढ्यांपर्यंत.
मोक्यामोक्यावर झेंडे रोवले
त्याचे दुःख नाही
पण
जातीजातींत माणसांच्या
कप्पे केले
विखार विखरून
सोयिस्कर आपापले
झेंडे उभारले
आणि
हे खेडं विदीर्ण करून टाकलं.
जिवाभावाचे ऋणानुबंधाचं
भवबंध मोडून
माणसामाणसांना आंधळं केलं
गनमन तुमच्या भोवल्याभोवती
भिरंगत ठेवल
कोणी सांगावं ?

आयुष्यात हजारदा
चढताना पडताना
छाताडावर घट्ट सोयींचे झेंडे
कवळून बसलात.
काळपटल्या पैशांच
गाठोडं बांधून
आजन्म किल्ले
लढवीत राहिलात.
गटारातल्या कवड्या
माळून गळाभर
साधुत्व मिरविलंत
गडगज गढ्यातले
दिवसाढवळ्या
सोन्यांच्या कौलांनी
कळस उभारलेत
तुमच्या देवघरातले.
घोकताना तासंतास
पूजापाठ घाबरून
सर्वस्व जपलं
आपल्या नात्यागोत्यातलं.
ज्यांच्या नावानं ऐश्वर्य उभारलं
त्यांचे संसार कोलाहलात जळताना
देशोधडी होताना
गढीतल्या गच्चीवरून
नुसते हसत राहिलात
निरामय जगताना
कोणी सांगावं, काय सांगावं
आणि कशासाठी ?
इथल्या संस्थांची संस्थानं झाली
आणि खुर्च्यांची सिंहासनं राजवर्खी

असलं कोणीतरी बोलून गेलं
सहज समुद्रावर . . . मंत्रालयासमोर
त्या फकिराच्या शब्दांतला घनाघात . . .
आघात झेलताना घामाघूम झालान
कसं सांगावं समजवून तुम्हाला
पुन्हा एकदा काळोख
सरबत्तीनं सरसकट
झोडपून काढील.
हज़ारदा सोसताना
आणि सर्वत्र मोडून पडताना
पेटून उभं रहातं
इथं माणसांचं मढं
तेव्हा गढ्यांची
अजस्त्र कवाडं कडेकोट ठेवा.
ऋतुमान बदलून चाललं आहे आता
सुखकर्त्या दुःखहर्त्या
गढीतले भक्तिभाव
बंद होताहेत.
बंद केले गेलेत त्यांचे आराधन
आरत्या
आणखी सगळाच साजशिणगार
मखमाली फुलांचे भरदार हार.
ह्या देवतांच्या मूर्तीवर
आता विश्वास उरला नाही
भल्या माणसांवर
त्यांच्या शब्दांवर
भुलणारे भोळे
भ्रमिष्ट होऊन फिरले.
त्या भोवल्यातल्या देवतांना

त्यांच्या सार्वभौम दैवी डोळ्यांना
काहीच दिसत नाही दारुण दुःखार्त
चांगल्या गोष्टींना
चांगल्या माणसांना
मोडीत काढणाऱ्या
अग्निडाग देणाऱ्या
ह्या व्यवस्थेला एकदाचा
साष्टांग नमस्कार.

नवलाच्या गोष्टी
एकविसाव्या शतकाच्या
ऐकताना थोडं
हिरवं होताना
शहारून आलेलं
पल्लवीत आपण आपल्या साठीच्या
नग्न नियोजनानं
गुरफटल्या प्रश्नात
पुन्हा मुकाट आपापसात.
ह्या गणितातला व्यवहार
पाठ झालेला
शून्याच्या संकल्पात.
ह्या नासलेल्या दिसांत
रस्ता शोधीत जावा आपणच आपला
कोणाला दोष द्यावा
आणि कशासाठी ?
स्वातंत्र्यात इथलं
पुष्कळ उभारलं
निसर्गात योजनात
भव्य दिव्य केलं

चंद्रावर जाणारं जगाचं विज्ञान
तसं काहीबाही संसारात आलं
घरीदारी आलं
स्वातंत्र्यात
मात्र आत्ताच्या विजनात
मोडतोड होताना सगळीच खेड्यातली.
माणसांची मनं पराधीन राहिली
दुबळ्या स्थितीनं
दुबळ्या मनानं
स्वातंत्र्यातही आज
पराधीन राहिली.
उभारता आली नाहीत
वाढत्या पंचांगात
निर्विकार सोसतांना
शद्ब उगारीत नाही
निस्तेज
उन्हातल्या ढेकळांसारखी.
कुणाकुणाला किती दोष द्यावा
आणि कशासाठी ?
गोदावरी कावेरी
आटून गेलेल्या दरीकपारी.
अवेळी आटलेलं जायकवाडी जलाशय
तापी नर्मदेच्या हिरव्या किनारी
तर विहिरींचं काय ?
शेतीबाडीचं काय ?
कुठला घेऊन बसलात ओलिताचा व्यवहार
संहार जवळ येतोय्
दळभद्री पावलांनी.
ऋतुचक्र झटपट बदलत चाललं आहे

तरीही कधीकाळी
निरामय मनाच्या पारदर्शी पारावर
हलका बहर
झांजरत्या सकाळी.
धाब्याच्या धुराडातून
पांढरा शुभ्र थवा संथ सरपटत
अभ्रागत हळुवार
अजूनही चंद्रकोर
नितळभोर आभाळभर
झांजरत्या वेळी
लालजर्द उगवत्या
सूर्याचं आरेखन
वाळल्या झाडातून
फांदीफांदीतून
इवलाले लालसर कोंभ दर्वळून
वैशाखवणव्यात उफाळत नव्यानं
जात्यावर सरत्या ओवीचं गाणं
दुःखार्त जीवघेणं.
वासुदेवाच्या भिरभिर भिरंगत
मनमोर नाचणाऱ्या
चिपळ्यांच्या तालावर
पुन्हा एकदा भाळावर कुंकवाचं लेणं
अहेवपण मागणं
नव्या जात्याच्या ओवीवर मनमोर
पहाटेच्या रिमझिम झांजरत्या वेळेला
पांढराशुभ्र धुराडा संथ सरपटता
फाटक्या संसारात कुठून तरी येणारा
लालजर्द घोडेस्वार उमेद बांधणारा.
लयबद्ध शहारा

जात्यातल्या पहाटेच्या गुणगुण ओळींवर
उमटत जाणारा.
झाडांना ओंजळभर
तांब्याभर पाणी
शेतावर झाडांची नव्यानं मांडणी.
निष्पर्ण पळसांच्या तांबड्याभोर फाल्गुनात
गगनगर्द जाणाऱ्या
झाडांच्या रांगा
दुष्काळी दिसांत
मोडून पडलेल्या.
पुन्हा उभं राहताना
सगळं नव्यानं उभारलं पाहिजे.
बर्फात, वाळवंटात
विराट पिकांचे अगणित संभार
उभं करणारे देश इवलाले
असोत दरियापार.
इथल्या ह्या मातीला
सुंदर आकाश
सुंदर निरंतर
लखलखता सूर्यप्रकाश
वाटा विज्ञानातल्या नव्या नवलाईच्या
रुजवल्या पाहिजेत आपणच रानावर.
पुष्कळ इतिहास वाचले मागचे
पुष्कळ दुखापतीचे
दिवस दुष्काळांचे
काळाच्या पांढऱ्याभोर
कागदाकागदावर
अस्तंगत होताना
जातीजमाती देशोधडी जाताना

पुन्हा आलेल्या
त्याच मातीच्या आसऱ्यानं अपरंपार
कष्ट करताना
नांदत्या पाहिल्या.
राज्यकर्ते नव्यानं येतील जातील
त्याचं कोणाला काय हशील.
एकादा फकीर असाही येईल
आणि हे ऋतुचक्र बदलवून जाईल.
सांगता येत नाही.
विज्ञानातल्या गर्तेतला
एकादा प्रतिभावंत
सूर्यसूक्त गाईल
आणि ह्या आभाळभर
पाऊस घेऊन येईल.
सांगता येत नाही
ऋतुचक्र सारखं बदलत चाललं आहे.

तरीही
हे आमच्या सार्वभौम आभाळा
तूच ह्या सगळ्यांचा
खराखुरा वाली.
भविष्याचं सुखदुःख
तुझ्याच हवाली.
सार्वभौम शक्तिमान
तूच आहेस
संजीवक सर्वांचा
तुझ्याशिवाय निरर्थ
सगळा व्यवहार.
दूरवर भरभक्कम कोसळत राहा

कोसळत राहा नांगरल्या रानात
दूरदूरच्या प्रदेशात
नाहीतर काहीच उरणार नाही
ह्या सबंध देशात
तुझं अस्तित्व नसल्यास वाया
माणसं विकल्या जातील बेहिसाब
त्यांची हाडंकाडं, मोडलेले संसार
उभे कर नव्यानं
अवकाळी पाऊसभार
क़ोसळू दे अंगांवर
नदीनाल्यावर
पुन्हा एकदा ह्या जायकवाडीवर
अथांग पाणी पाहू दे डोळे भरून
सगळे हरून गेले आहेत
ह्या वर्षांपाठोपाठच्या संहारक दुष्काळांत.
योजनांशिवायच्या राजकीय तळागाळात.

हे आभाळा,
का रागावलास बाबा इथल्यांवर
एकविसाव्या शतकाच्या सुंदर स्वप्नांचे
होईल ते होवो
त्यांना कोण सांगणार ?
कसं सांगणार ?
ते कोणाचे ऐकणार ?
रया निघून गेलेल्या शेतीचा नापीकपणा
अंगावर येईल जेव्हा भयाणभूत अंगांनी
शंभर कोटींच्या
वखवखल्या पोटांनी
तेव्हा जागे होतील राज्यकर्ते खडबडून

भेदरल्या भयभीत भुताडासारखे
दगड धोंडे लोखंड
भूखंड खाऊन
जगत नसतात कुठलीच सामान्य माणसं
हे त्यांना पुन्हा पुन्हा सांगता येत नाही
फ़ार उंचावर इथला आवाजही पोहचत नाही
शद्ब विरून जातात वाऱ्यावर.
सावलीपुरतं आकाश पाहाणारे हे आपलेच लोक
आणखीनच विद्रूप करतील
इथल्या मातीच्या माणसांना.
इथल्या खेड्यापाड्यांना.

हे दयाघन आभाळा
तुझा काळानिळा शिरताज एकदा डोक्यावर घे
झाडून टाक मनातल सगळं खळबळून
एकदा मोठ्यांदा
क्षमा कर मनापासून ह्या देशातल्या दुबळ्यांना
भरभरून पावसातून
उभा राहू दे हा देश
ही माणसं
चिडीपाखरं
घरट्यातून जगू दे सुखानं समाधानानं
अंधारातून पुन्हा प्रकाशाकडे जाण्याचा
तुझा चिरंतन आशीर्वाद दे.

घुंगरांच्या तालावर पेरणी होईल शिवारभर
हारीहारीवर दीप उजळतील बांधा बांधावर
घरांचे उंबरठे हिरव्या चुड्यांनी
अंगण सारवतील, रांगोळी काढतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०८
२६९२३
काव्य २२।५।००
सम्पर्क शाखा

ढेकळांच्या गर्तेतून मातीचा सुगंध
ओसंडून उन्मळेल.
पिंपळपारावर
नदीनाल्यावर
पक्षी येतील समुद्र सोडून
गातील गाणं.
राष्ट्रगीताएवढं सुंदर, शुभंकर.
तुझं एकट्याचं येणंही पुष्कळ.
बाकीचं काहीच मागणं नाही कुणाजवळ.
तू ये
पुन्हा एकदा पहिल्यासारखंच मनावर घे
काळ्यानिळ्या ढगांच्या गिर्रेबाज अवकाशात
चौखूर उधळून
लयबद्ध गाण्याची लकेर ऐकू दे
बैलांच्या शिंगांवर मातीची शानदार
कमान बांधू दे.
पुन्हा एकदा लदबदल्या
पिकांचे संसार शेतावर पाहू दे
होऊ दे सगळं आबादीआबाद
शेतीवर सगळेच
कष्ट करू बेहद्द सगळ्यांसाठीच,
फक्त तुझे आशीर्वाद दे.
राजा,
तुझ्या बरसाती युगाचा
आरंभ होऊ दे.

म्हातारीचे डोळे लखलख होतील
पुन्हा एकदा तुळशीजवळ
गोष्ट सांगेल ती पुन्हा नव्यानं

बायाबापड्यांना, चिल्यापिल्यांसाठी
उमेद येईल नव्यानं
सूर्यनारायणाला आरती करून
भल्या पहाटे त्या कुंकू लावतील भाळावर.
घरभर भरलेलं घरपण दिसेल
थोडं तरी खेड्यावर.
आपापल्या खेड्यावर माणसं येतील
कंटाळून शहरातून
पुन्हा एकदा मातीतून मृद्गंध दरवळेल
आंब्याच्या झाडावर
झुझुरक्या पहाटे
कोयड गाणं गात आहे
रोहिणीच्या सावलीत
मृगाचं नक्षत्र
संथ हलक्यानं सरकत आहे.
वारुळं बांधून झाली भक्कम
मुंग्यांनी घरं केली बांधावर
तुझ्या स्वागताला
उत्सुक सर्वदूर वाटावाटांवर.
तुला सामोरं येतांना
प्राणातून गातांना
कोट्यवधी प्राणांच्या प्रार्थना दयांघना
भरभक्कम ये
घनगर्द ये
चांगल्या युगाचा आरंभ घेऊन
आणि
माणूस म्हणून
उभं रहायचा आशीर्वाद दे.

●

# २.

# सुना सोन्याचा पिंपळ



## २ सुना सोन्याचा पिंपळ

१

खुळ्या मोडक्या खेड्याचे
डोळे गळू आले आता
झाडांतून उदासल्या
पार धुवाँधार वाटा

स्वाती नक्षत्राची गेली
सारी आबादी सरून
माणसांच्या भेटीमंधी
आले रुखे मुकेपण

खोप्यातला सावरून
चिडीपाखरांचा तांडा
नुस्ता जगण्याला आला
कारुण्याचा भोगवटा

भोगवटा सोसताना
रानोमाळ ओला स्वर
तरी गिर्रेबाज आज
खोटचा नशेत गुबार

पाठीवरी नित्य ओझे
रस्ते दूरचे उदास
सांगणेही संपलेले
तरी डोळे भिजतात.

२.

उभ्या श्रावणाचा झाला
शुभ्र वैशाखी पारवा
हिर्वं जाळून आभाळ
निघालेलं गावोगावा

भुई भेगाळली भारी
कुठे थोडा ना ओलावा
गुराढोरांचा हंबर
तहानेनं व्याकुळावा

करपल्या पिकातली
पानं पिंगट गळून
काडीमुडीच्या झाडांना
भादव्याचं उदेपण

पानपाचोळा भणंग
भोवऱ्यातल्या आकाशी
ठेपा सोडून पाखरं
निघालेली दूरदेशी.

३.

रात्र काळोख पिऊन
घोट घेते आभाळाचा
तव्यावर जळे पाणी
तसा संसाराचा वासा

किती ढोसाव्यात काड्या
चूल पेटता पेटेना
करपल्या भाकरीचा
घास गळा उतरेना

पोराबाळांच्या डोळ्यांत
आर्त पाणी रूखे सुके
दुःखांतात गणगोत
पार झालेले पारखे

बिंद्राबनाशी सांजेला
दिवा जळेना नितळ
ओट्यावर सुनी रात्र
सुना सोन्याचा पिंपळ.

४.

नाही पंढरीची वारी
नाही आषाढी कार्तिकी
देवळातल्या दिव्याला
नाही काकडआरती

एखादाच कोणी वेडा
वीणा छेडतो प्राणात
विझणाऱ्या शद्बांतले
स्वर दाटले कंठात

आम्ही काय केले पाप
सांग तरी विठूराया
कशासाठी संसाराची
अशी घालवली रया

युगे अठ्ठावीस झाली
झड घाली पांडुरंगा
कुणब्यांच्या शेतावर
धाड तुझी चंद्रभागा

रानोमाळ पेरलेले
कोंभ रुजू दे दाण्यांचे
तुझ्या पालखीला आम्ही
शद्बं बांधू तुकोबाचे.

५.

खेडोपाडी मोडलेल्या
कुणब्यांना गर्भवास
तुका उडून जाताना
देहू निरभ्र उदास

देहू निरभ्र उदास
पंढरी़ला लागे धस
वाळवंटी कीर्तनात
वेडा घेतो गळफास

डोळ्यातल्या अंधाराचा
कुठे सापडेना तळ
सुनी सुनाट पंढरी
सुना सोन्याचा पिंपळ.

# ३.
# पंचनामा



## ३ पंचनामा

१

गिधाडासारखं विमान संथ
उतरलं जमिनीवर
आणि साहेबांचं पाहणी पथक
शंभर गाड्यांनी सामोरं आलं.
रयतेचा राजा
राजरस्त्यावर
अपार कडेकोट बंदोबस्तात.
चिटपाखराशिवायचे सगळेच रस्ते
सगळेच राजरस्ते माणसांशिवायचे
ओसाड भयभीत स्मशानासारखे.

२

प्रचंड किंकाळ्या
ओक्साबोक्सी
रडण्याचा आवाज बंदिस्त घरातून
कडेकोट बंद दरवाजातून
चुकार एखादा रक्तबंबाळ माणूस
हलका गलका
गुडीगुप्प होणारा
कुठल्यातरी प्रार्थनामंदिरात जमाव
संभावित माणसं धर्माच्या पडद्याआड
– शहर उजाड.
सबंध शहराचे रस्ते नुस्ते
मरणग्रस्त ग्रासलेले
पाशवी मनाच्या आंधळ्या डोळ्यांचे
पुरातन बेदरकार झेंड्याझेंड्याचे.
सगळं माणूसपण बासनात बांधून
खिकाळत बसलेले राक्षसी हत्यारांत
वेढलेले रस्ते. . . नुस्ते नुस्ते.
रस्ते ग्रासलेले
प्रचंड खाकीच्या माणसांनी
(बनावट खादीच्या माणसांनी)
भयभीत एकेकटे ठप्प झालेले
शहरभर दूरवर तुटक्या घरांचे
जळालेले खंडहर रस्त्यारस्त्यांवर
सामान्य माणसांचे
ठिबकत गेलेले रक्तबंबाळ थारोळे
शहर भुताटकी, अफवांच्या वाऱ्यावर.

३

हजार पोलिसांनी वेढलेले साहेब
सुभेदारी बंगल्यात
सुरक्षित आरक्षित
बसलेले एकटे.
चिटपाखरूही नसलेल्या
माणसांच्या चर्चेत.
कागदांच्या
प्रचंड ढिगाऱ्यात साहेब
साहेब भयव्याकुळ
घामेजून थकून हबकून गेलेले.
मृत्यू मृत्यू मृत्यू आणि मृत्यू. . .
प्रचंड शस्त्रांचे आकडे निनावी
माणसं माणसांना
पारखी होऊन माणूसपण विसरून
पशूपक्ष्यांपेक्षाही अडाणी निर्विकार.
पसायदान विसरून
विसरून कबीर आणखी कुराण इत्यादी.
खुर्च्यांच्या राजवर्खी स्वार्थानं पेटलेली
आंधळी माणसं गजर करताहेत.
खुर्च्यांच्या खोट्या अहंकारात गढलेली
थोराड माणसं गजर करताहेत
चिंध्यांची रंगीत टोपी जोडून
त्याला राजमुकुट म्हणताहेत.
सगळा आकांत.
अविश्रांत माणसं पागल झालेली.
गल्लीबोळातून.

गरिबाला जगणं कठीण झालेलं
गल्लीबोळातून.
माणसं कापताहेत सरळसोट सबंध
कुठेच कुणाला धरबंध नाही
गल्लीबोळातून.
मृत्यूचे आकडे
झाकलेले उघडे
खोटेनाटेही
कित्येक निरपराध
नावांशिवायच्या
बेनाम घरांत
आतड्यांचे तुकडे
नामोनिशान नसलेल्या गाड्यांमधून पसार
कुठेच कशाचा मागमूस लागत नाही.

४

एवढ्या शहराच्या
निस्सीम एकान्ताला
चिरून नेणारा कुत्र्यांचा गोंगाट
घारींचे थवे चक्राकार आभाळभर
गिधाडे घिरघिरत डोंगर कठड्यान
गटारीनं लालजर्द रक्ताचे सडे.
पाशवीपणाच्या बलात्काराचे कुठे
पेटलेले धिंडवडे, कित्येक मोहल्ल्यांतून
पारतंत्र्यातले

प्रचंड भेदरलेपण
सबंध शहरावर अंगरखा पांघरून.

५

कागदांचे ढीग फेकून साहेब
घामेजून भयग्रस्त
नीट बोलत नाही
नीट ओळखत नाही
समोरच्या ओळखीच्या
आपल्याच माणसांना.
लालजर्द फितीच्या
बांधल्या कागदांना
सोडत नाही साहेब.
साहेब अस्वस्थ
राजवर्खी सिंहासनात
बसलेले एकटे.

६

मी ऐकून घेणार नाही
मी काहीच ऐकणार नाही.
चालते व्हा म्हणतो ना
बिलकुल चालते व्हा इथून.

ह्याला पुण्याला धाडा
ह्याला ठाण्याला धाडा
कसा काय चालणार
ह्या राज्याचा गाडा ?
काहीच पाहू नका
काहीच ऐकू नका
दिसतील त्यांना दिसतील तिथे
तात्काळ गोळ्या घाला.
मी पाहून घेईन नीट
पाहून घेईन थेट मुंबईपर्यंत.
आता मी कोणाचीच गय करणार नाही
त्याशिवाय हे राज्य चालणारच नाही.
हे राज्य खरे तर गरीब दुबळ्यांचे.
तळागाळातल्या
झोपडीतल्या माणसांचे.
हे राज्य खरे ज्यांचे
त्यांनाच इथे नीट जगता येत नाही.
हे राज्य कोणा एका धर्माचे नाही
हे राज्य खरे तर
रयतेचे.
कुणाच्या बापाचे नाही.
मी पाहून घेईन
कितीही मोठा असेल
कोणी कुठल्या पंथाचा
मी कारवाई करीन.
पण पाणी द्या थंडगार
पाणी द्या आधी.
ह्या पेपरवाल्यांना इथून
घालवून द्या आधी.

७

हे रक्तबंबाळ लोक
हटवा माझ्या समोरून दूरवर
असतील आमदार लोकांचे कैवारी
मला तर दिसताहेत ह्या शहराचे वैरी.
प्रेषितासारखे उजाडतात अकस्मात
आणि करकरीत भाषणं ठोकतात
स्वतःला सावरून, सगळं उद्ध्वस्त झाल्यावर
पुन्हा आम्हालाच जाब विचारतात.
म्हणे हे कैवारी!
सगळं शहर गळाबंद झालेलं
मला ह्या खिडकीतून
सगळेच रस्ते ओसाड दिसतात
प्रत्येक पावलावर
झेंडेच दिसतात
हिरवे भगवे
आणखी वेगवेगळे
कसे काय रोवतात
रस्त्यारस्त्यांवर
तेव्हा ह्या शहरभर तुमचे हात
कसे काय कुठे गुंतलेले असतात.
मला घरघर येते ह्या सिंहासनावर.
पाणी द्या
थंडगार पाणी द्या . . .
रक्तबंबाळ माणसं, कागदांचे भेंडोळे
पहिल्यांदा समोरून घालवून द्या बाजूला.
मला काहीच कसं कळलं नाही . . .

कोणीच कसं सांगितलं नाही ?
सर्वत्र इतकं घनघोर जळताना
काहीच कसं नीट कळलं नाही ?

८

साहेब,
परिस्थिती गंभीर आहे
फारच फार गंभीर आहे.
बाकीचं सगळं नंतर बोलू. . .
हा अहवाल तरी थोडासा वाचून घ्या एकदा
आणि आम्हाला आधार द्या एकदा.
आपलेच दात आणि आपलेच ओठ
असे पुष्कळ काही, कुठेच कुणाला धरबंध नाही
सांगतो आखलेलं. . . झाकलेलं सर्व काही.
साहेब तुमच्या कानात सांगतो
एवढं तरी थोडं ऐकून घ्या आमचं
आख्खं शहर वठणीवर येईस्तो
आख्खं शहर पहिल्यागत होईस्तो
थोडंसं साहेब समजून घ्या आम्हाला
परिस्थिती फारच गंभीर आहे, साहेब. . .

९

निर्मनुष्य शहराच्या
राजरस्त्यावरून गाड्या निघाल्या.

गिधाडासारख्या
शंभरेक दोनशे
कडेकोट बाहेर गावकुसाबाहेर
दूरवर विच्छिन्न
रडणाऱ्या कुढणाऱ्या
झोपड्या ओलांडून
शहराबाहेरच्या
नजिकच्या खेड्यावर
पांढरीच्या शेतात
छबील्याशी सगळ्या गाड्या थांबल्या
लालजर्द दिव्यांच्या.

१०

पदर तोंडाला लावून रडणारी
वीसेक वर्षांची गर्भारशी पोर
करपून गेलेल्या पिकाच्या तिच्या
पांढरीच्या शेतावर
एकटीच.
आसमंतात किंकाळी फोडून
रडताना साहेबांसमोर
घामेजल्या पदरानं.
घामेजल्या पदरानं
पुसलेलं तिचं लालजर्द कपाळ
सगळ्याच साहेबांना भयभीत करणारं.
ती काहीच बोलली नाही
तिनं शिवी दिली नाही

तिनं सही केली नाही
ठेवलेल्या कागदावर,
फक्त वेड्यागत किंचाळत राहिली
पुसलेल्या लालजर्द कुंकवासाठी
निराधार. गर्भार.
शेलाटी. एकटी.
पुन्हा पुन्हां
ओथंबून किंचाळत राहिली
धाबल्यात जाऊन
फाडलेल्या पदरात
दहा हजार गुंडाळले
साहेबांनी दिलेले.
साहेबांसमोरच
आक्कांडी लावली
आणि ती पुन्हा दुःखाच्या ओझ्यानं
गर्भाच्या ओझ्यानं कोसळून पडली.
उठताना पुन्हा ज्वाळांकडे पहात
किंचाळत राहिली.
मुसलमान हिंदू
आणि कित्येक जातींच्या
उद्ध्वस्त संसारातल्या
शंभर दोनशे रांडव मायबहिणींच्या वतीनं
तिनं हंबरडा फोडला साहेबांच्या दिशेनं
गाडीवर फडकणाऱ्या तिरंगी झेंड्याकडे
ओलावल्या डोळ्यानं.
गाड्या भयग्रस्त निघून गेल्या
काही न बोलता साहेबांसकट.
जुन्या वळवल्या वळणावरून
अबोल इमारती. . . झेंडे टाकून.

शहराचे अंगावर येणारे रस्ते
रस्ते परस्पर विमानाकडे भरधाव गेलेले.
आल्यागत विमान निघून गेलेलं
दूरवर आभाळात, गिधाडासारखं
निश्‍चित विमानतळ. . .
सुटलेले एकदाचे निश्‍चित सगळेच
थोडा वेळ गंभीर. . .
शांतता कमिटीची आठवण होऊन
लगबग निघालेले
महात्मा गांधी कॉंग्रेस भवनाच्या दिशेनं
आपापल्या बंदुका सावरून, घाबरून.

११

कागदपत्र सह्या
छायाचित्र आणखी पंचनामा इत्यादी
सगळंच घ्यायला थांबलेला अधिकारी
विचलित झालेला. . . धाबल्याजवळ.
गळाभर दाटलेला
दहा हजारांच्या जळत्या ज्योतीसमोर.
वेड्यागत वेंधळा हात जोडून
प्रार्थना म्हणताना
अजिंठा-वेरूळच्या करुणामयी बुद्धाला
घृष्णेश्‍वराच्या ओंकारासमोर
नाथांचे भारूड, आपेगाव आळवताना
जगाचं शहाणपण सर्वत्र इथे
ह्या खुल्ताबाद रस्त्यावर कबीर शोधताना

पसायदान म्हणताना भाबडा अधिकारी
जळत्या काजळत्या ज्योतीसमोर
वेडा झालेला
भटकतो आहे भयाण भुयारातून
खुल्ताबादच्या तळघरात जाऊन
अजिठा-वेरूळच्या डोंगर झाडीत
निष्पर्ण तरीही
रस्ता विसरलेला
वेडा अधिकारी
माणसातला हरवलेला माणूस शोधतो आहे
प्रार्थना म्हणतो आहे
राष्ट्रगीतामधल्या एकसंध शब्दांची
अथांग सर्वांची . . .
गळाभर दाटलेले राष्ट्रगीत
ज्योतीच्या राखोंडीसमोर
पुन्हा पुन्हा गातो आहे.
शुद्धीवर आल्यावर वेडा सही मागतो आहे
गर्भार पोरीच्या कागदपत्रांसाठी . . .
वेडी माणसं धुंडतो आहे पंचनाम्यासाठी.
— अजून पंचनामा व्हायचाच आहे!

●



४.

# दीपस्तंभ



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०८
२६९२३
काव्य २२।५।००

## ४ दीपस्तंभ

१.

शब्दांत सांगता येत नाही असे आयुष्य
ऐंशी वर्षांच्या तुझ्या डोळ्यांतला
लखलख प्रकाश आम्ही पाहतो
आम्ही पाहतो मलूल डोळ्यांनी
तुझ्या टवटवीत शब्दांचे तरारलेपण
ज्या शब्दांनी माळरान जागविले
कभिन्न काळोखात
स्वातंत्र्यातही कधी
काळोख्या क्षणात
तुझे शब्द भडकले ज्वाला होऊन
बेचाळीस सत्तावन्न आणखी नंतर कित्येकदा

आणीबाणीतल्या कर्दन काळोखात
तुझे शब्द सगळ्यांना दीपस्तंभ झाले
म्हणून तर ही ओंजळीतली फुले
तुझ्या पावलांवर ठेवताना शहारा येतो
कधी विषण्ण क्षणांनी गळा दाटून येतो.

२

तुला फक्त एकदा रडताना पाहिलं ओक्साबोक्शी
देवगिरीच्या तुटल्या गडाच्या खिंडारात
भिंतीज़वळ
तुझ्या गळ्यात पडलेले आंबेडकर
आणखी महात्मा गांधी
अनवाणी डोंगरात
गोदावरीचं गंगाजळ ओथंबून
तुडुंब भरलेलं
जायकवाडीच्या पापण्यांत
तजेलदार डोळ्यांनी तू पाहिलास
अजिंठा
भस्मसात होताना गौतमबुद्धाच्या डोळ्यांत.

३

तुझ्या गळ्यात खेटरांच्या माळा
त्यांची फुलं होतील इतिहासात

सगळं जाऊ दे
तुझ्या इतिहासातली सोनेरी पानं
विचारांची
अस्मितेची
राजरस्त्यावर ठेव आमच्या
धुरकटल्या वाटांच्या
तुझ्या मंत्राची शक्ती दे
पंचविशीतल्या म्हाताऱ्या तरुणांना
ताठ कणा दे
तुझ्या पिढीच्या स्वाभिमानाचा
पंख दे बेचाळीसचे
क्षितिजापर्यंत झडप घालून
आकाश कवटाळू दे
ह्या वयात
तुला सांगण्याची आम्हाला
लाज वाटते
पण जवळच्या काळोखात काजवेच फार
तुझ्यासारखी तेजस्वी
माणसं फारच थोडी
पण त्यांनाही काट्यांची तुटलेली कपार.

४

जरा झणत्कार येऊ दे
ह्यावेळी शेवटचा
ओंकाराएवढी चिनगारी शब्दांना लाव

अंधार अंगावर येतो आहे
माणसामाणसांनी
तुकड्यांतुकड्यांनी
देश मोडला जातो आहे
शब्दांत मांगता येत नाही
तुझे शब्द दे
जरा चिनगारी लाव.

५.

# समुद्रापलिकडचा समुद्र



## ५ समुद्रापलिकडचा समुद्र

समुद्रापार पहिल्यांदा मी दूरच्या प्रदेशात
उडून जाणाऱ्या विमानात
मलाच घट्ट कवटाळून
पुन्हा पुन्हा एकटा
उडून जाणारा माझा जीव
धांदरलेला अथांग अवकाशात
पांढऱ्या शुभ्र ढगांच्या अंतहीन पोकळीत
अंतहीन समुद्रात . . .
खोलवर डोळ्यांना पोचता येत नाही
त्या पलिकडल्या जगतात, तुकोबाच्या वैकुंठात.

माझ्या अंगावर थरथर . . .
मनावर स्पर्शून जाणारी शाई
काळीनिळी माझ्या मृत्यूच्या बातमीची
आई,

तुला मी पुन्हा पाहीन सुखरूप
तुडुंब डोळ्यांनी.
निघताना बायकोही कोमेजल्या डोळ्यांनी
वेंधळ्यावाणी
माझ्या डोळ्यांवर पुन्हा घरची पांघरणी
समुद्रापार पहिल्यांदा मी पुष्पक विमानी.

वामनाच्या पावलांनी
वेटाळणारं विमान
पांढऱ्या भोर ढगांनी
अथांग लादीतून, दर्यातून निनावी
समुद्रधुक्यातून . . .
मी सावरून
सोबतच्या सोबत्याला कवटाळून.
समुद्र . . . आकाश . . .
समुद्र अन्तहीन आकाश अवकाश

सगळ्या सुखांचा वर्षाव विमानात
तरीही माझे थरथरते बाहुपाश.
अनोळखी अवकाशात . . .
जगभर वेढलेला समुद्र
माझ्या खिडकीतल्या डोळ्यांत.

टेकड्यांच्या उतारावर
सुंदरशा घरांच्या इवल्याशा रांगा

निसरड्या हिरव्यागार . . .
हिरव्यागार लादीवर अमलीन निर्मळशा
टेम्सच्या काठावर
निर्मळ पाण्यावर
झुलणाऱ्या नावा . . .
एका अनोळखी गावा.
झाडाझुडुपांच्या
फुलांच्या बहरत्या
रंगभोर बागा लदबदलेल्या
पांढऱ्या शुभ्र पाण्यावर सरपटते प्रवाह
हळुवार हालते . . . वाऱ्याच्या झुळुकीवर

टेम्सच्या काठावर
इवल्याशा नावा.
निळाभोर लहानसा पक्ष्यांचा थवा
पाण्यावर सरपटता . . .
प्रेमिकांच्या झुलत्या
गाण्यात बुडालेल्या होडक्यांच्या नावा.

टेम्सच्या तीराजवळ
घिरघिरतं विमान घारीसारखं
एका सुंदरशा गावा.

लंडन
हॉटेल लेग्झिंग्टन.
पांढुरकी पहाट रिमझिम
झिमझिम हलक्या पावसाची . . .

ओव्हरकोट घातलेली
इवलाल्या छत्रीतली अबोल अस्फुट
अमलीन रस्त्यावर फुलाफुलांच्या . . .
मड्मा माणसं
टकटक मेंदीच्या लालचट पावलांनी.
रस्ताभर चिवचिव
हळुवार बोली . . .
ओकेऽ
गुडबाय्
थँक्यूची मखमाली.
बोली थोडीशी लाजवट
एकादी चुंबनात बुडालेली.

पॅलेसच्या सुंदर
दिमाखात भिंतीला
राजरस्त्यावर बलदंड
वेढलेले साखळदंड
पॅलेसच्या जवळपास
वळणावळणावर
राजबन्शी साम्राज्य दिमाखात दिपवणारं
अजूनही पॅलेसच्या रस्त्यावर
वेढलेले सोनेरी साखळदंड . . .
माझ्या डोळ्यांत, स्वप्नांच्या धुराळ्यात
आम्हाला कित्येक साल बांधून ठेवणाऱ्या
साखळ्यांचा स्पर्श मला कुरतडणारा.
राजरस्त्यावर तुरळक
गाड्यांची गर्दी
माणसांची गर्दी

अबोल हळुवार चिमणीच्या पावलांची.

माझे डोळे
स्वातंत्र्याआधीच्या दुनियेत बुडालेले
घोड्यांच्या टापांनी चुरगाळलेले
आजही राणी मला घोडाबग्गीत दिसतेय.
माझ्या अंधाऱ्या डोळ्यांनी.

टपटप टापांच्या टांग्यानं हलणारा
भवतालचा पार, पॅलेसच्या सभोवार
राजवर्खी करड्या डोळ्याचे रूपवान
ऐश्वर्य दरियापार . . .
रूपवान हिऱ्याच्या अंगठीचा झोत
डोळ्यांवर लखलखता
धुक्यातला थरथरता अंधार क्षणभर
हलता . . . हेलकावता.
टक टक टापातला.
सर्वत्र गुंजारव.

रस्ताभर चौफेर . . .
चौफेर इस्किलार.
टप टप घोड्यांच्या वाजणाऱ्या टापा
रूपवंत रस्ताभर.
प्रकाशझोत सर्वत्र
राजवर्खी बेगुमान, रस्त्यारस्त्यावर.

माझ्या डोळ्यांत, घनदाट दाटलेले
जीएंचे डोळे इस्किलारमधले.
अंगभरचे माझे साखळदंड झटकून

पुन्हा मी रस्त्यावर निघालेला सावरून.

नजिकच्या देखण्या लायब्ररीत जीए.
तुकारामाच्या शोधात
मी भणंग एकटा
शेक्सपीअरच्या जोडीनं बसलेला कालिदास
उदास जीवनाचं तत्त्वज्ञान सांगणारा
विवेकानंद बसलेला कांटच्या समवेत.
तॉल्सतॉय, आल्बेर कामूच्या समवेत.
फ्रान्झ काफ्का. नित्शे, ब्रेश्त
एकाच दालनात मतभेद विसरून.
जगभरच्या जीवनाची
विराट विद्रूपता, विराट सौंदर्य
प्रतिबिंबित करणारे प्रतिभावंत थोर
भिंती फोडणारे देशोदेशींच्या.
समुद्रापलिकडल्या समुद्राहून विशाल
अथांग आकाश धुंडत फिरणारे
मानवी दुःखांचं तळघर शोधणारे
ह्या पुस्तकांच्या मंदिरात.
गोंधळून गेलेल्या माझ्या संपूर्ण डोळ्यांत
एका निवांत देखण्या लायब्ररीत
मी लेग्झिंगटन सोडून
लाखो लेखकांच्या साम्राज्यात.
इस्किलार आणखी किंगलियरच्या घोर
काळ्याकुट्ट भुताडात.
भटकताना एकटा रात्री-अपरात्री
अनोळखी शहरातून. . .
अनोळखी वाटांनी

मी एकटाच वेडा भरकटत फिरकताना.
स्टेडियमसमोरच्या मिणमिण उजेडात.
जवळपासच्या घराकडून
एका गीताची लय
अंधार चिरून नेणारी.
सैगलच्या शब्दांतली
कंठात रुतलेली जाडी भरडी साय.

ओळखीच्या स्वरांची
हेलावून टाकणारी दुःखार्त विकलता
ह्या अनोळखी दुनियेत, स्टेडियमजवळ,
स्वरलता दुःखाचं गाणं गात आहे.
स्वरलता प्राणातून गाणं गात आहे.
कबुतरासारख्या शांत इमारतीवर
पांढऱ्या भोर स्वरांची सतार हलते आहे.
लता . . . स्वरलता . . .

तू कसलं दुःख वेचते गं बाई ?
बाई तू अशी . . .
हळुवार ओठांनी गाऊ नकोस बाई . . .
दिदी . . .
इकडे मी दुःख विसराया आलो.
तुझं हे गाणं बंद कर बाई . . .
दिदी, तू गाणं बंद करून मला थोडंसं सावर
माझ्या डोक्यावर
इथं थयथया नाचतंय्
त्या हॅम्लेटचं कलेवर

जीवनाचं प्रचंड तळघर शोधणारे
भेटलेले लेखक ह्या लायब्ररीच्या कठड्यावर.
रस्ता विसरून गेलो मी इथं
ह्या स्टेडियमच्या रस्त्यावर.

न्यू यॉर्क.
सत्तासंपत्तीनं
दडपून टाकणारं दैदिप्य वैभव.
मी भेदरून गेलो
हे साम्राज्य सगळं डोळ्यांनी न्याहाळताना.
ऐकताना, वाचताना
मला घेरी येते इथं
हे शहर आख्खं माझ्या उरावर कोसळतंय
एका गरीब देशातला
दुबळा कुठला तरी सामान्य माणूस . . .

गगन गर्द आभाळ
छेदून जाणाऱ्या ह्या इमारती घनगर्द
कशा काय रुतून बसल्या आभाळात
कित्येक मजल्यांच्या
कशा काय नेऊन बसविल्या असतील ?
मला ह्या रस्त्यांवर चालता येत नाही
न्यू यॉर्कच्या चकचकीत
ह्या संपत्तीचा गुमान, गुमान सत्तेचा
मी ऐकला होता . . . भयभीत करणारा.
माझा ऊर दडपतो हे न्यू यॉर्क पाहून.
मला बोलता येत नाही . . .

काहीच सुचत नाही.
हे गगनभेदी शहर मला पागल करील.
इथले हिशेब मला लागत नाहीत.

माझ्या भारतीय मेंदूनं.
जगाला चकित करणारं
तुझं साम्राज्य तुला लखलाभ असो
न्यू यॉर्क. . .
लखलख सळसळतं शहर
माझे चक्रव्याळ भेटून जाणारं.

मात्र मला भेटू दे लिंकनला एकदा.
त्याच्या स्मारकाला माझी फुलं वाहू दे.
त्याचे डोळे, करुणा
मला पाहू दे डोळे भरून.

लिंकन.

प्रत्येक चांगल्या माणसांच्या
खुनाच्या रक्ताचा रंग सापडत नाही
इतिहासाच्या पुस्तकात.
(आमच्याही देशात.)
तुझं थारोळंभर रक्त सांडलेली जागा
मला पाहू दे डोळे भरून.
तू थोर होतास आणखी वेडासुद्धा.
या संगमरवरात गाडलेल्या
तुझ्याच शब्दांचे अर्थ त्यांना सांग तू एकदा
काळ्या गोऱ्या कातडीचं
त्यांचं मळकट मन अजून
डागाळलेलं गुलामांसाठी
इतकं पाणी वाहिल्यावरहीं . . .

ह्या जेटच्या जगतातल्या
तुझ्या माणसांना तुझं वाचून दाखव बायबल.
क्रूसाच्या खिळ्यातलं – रक्तात भिजलेलं
सुंदर संगमरवरात आता गोंदवून ठेवलेलं
व्हाईट बंधूंच्या विमानांचं तळ
मैलभर पसरलेलं
पहिलं विमान त्यांनी उडवलं अवकाशात
ते प्रतिभावंत जेते . . .
जगभरच्या वाटा ज्यांनी जवळ केल्या
त्या प्रतिभावंतांचे मला पाय धरू दे.
पृथ्वी सोडल्यावर
अंतराळदु:खात
सहाय्य करणारं रशियाचं यान
भेटलेलं अमेरिकन यानाला
तिकडे एकत्र जिवलग
त्या ऐतिहासिक क्षणाचं स्मारक
मनाला हलवून टाकणारं.
त्या देशांनाही पुन्हा हिणवून सांगणारं . . .
हे स्मारक अनंत जिवंत गोष्टींचं
पुतळ्याशिवायचं सुंदर हिरवंगार.
हे स्मशान . . .
हे राष्ट्रीय स्मारक.बलिदान केलेल्यांचं.
देखणं. एकाग्र. थोरामोठ्यांचं.
हिरव्या झाडांनी लदबदलेलं
हिरव्यागार हिरवळीतलं.
एकेका नावानं लावलेली झाडं.
सळसळणारी ध्यानस्थ चिरंतन.
केनैडीच्या ख़ुनाची जळणारी ज्योती . . .
ह्या ज्योतीवर कांतिमान प्रकाश जळतो आहे.

ह्या स्मशानात झाडांची स्मारकं हिरवीगार
गालिच्यासारखी
थोर थोर कवींच्या
लेखकांच्या ओळींची गुणगुण ओठांवर.
ह्या स्मशानावरही प्रेम करावं
नतमस्तक व्हावं इतकं सुंदर.
हिरव्यागार गालिच्यातल्या
ह्या झाडांच्या स्मशानात
बालकवींची कविता ओठावर येते
फुलराणीच्या पावलांशी
चांदण्याचा सडा सांडणाऱ्या राजा,
तुला उद्ध्वस्त धर्मशाळेतून
वेंधळ्या वाटेनं जाताना पाहिलं,
औदुंबराच्या वाटेनं
काळ्याकुट्ट डोहाकडे
तू भरल्या संसारातून निघून गेलास.
माझ्या राजा,
माझ्या आवडत्या राजा,
अलवार शब्दांची मोहिनी जगताना
काळ्या इंजिनाखाली गडप झालास . . .
ह्या जगताच्या
कवितेच्या शिरोमणी राजा
स्मशानात नसलेल्या
तुझ्या स्मारकासाठी
माझा कंठ दाटून येतोय. भरगच्च, काळाभोर.

माझ्या देशात
चांगल्या कवीचं स्मारक करता येत नाही.

बालकवी आयुष्यभर भटकत राहिला
एकटाच अनवाणी
ह्याचं दुःख मला अंतर्यामी
काळीज कोरणारं . . .
वॉशिंग्टन्‌च्या स्मशानात
छिन्न भिन्न करणारं . . .

त्र्यंबक बापूजी ठोंबरे, माझा बालकवी . . .
स्मशानात मृतांना,
इथल्या थोर थोर मंडळींना
बालकवींच्या कविता ऐकविल्या मोठ्यांदा.
गंमत म्हणजे
सगळेच उठून बसले बालकवी ऐकताना
लपझप ज्याच्या त्याच्या झाडाजवळ हळुवार.
बालकवी ऐकताना . . .
आख्खं स्मशान जागं झालं
आणि मला बालकवीच्या कविता मागाया लागलं.
एकेक पान फाडून
एकेक ओळ तोडून
मी बालकवी वाटला
स्मशानातल्या झाडांना.
मला वेडा समजून स्मशानात
माझे खिसे तपासले
तिथल्या समंजस माणसांनी.
पत्ता काढून मला हॉटेलात सोडले
आणि वरती थँक्यू म्हणून ते निघून गेलं.

न्यू जर्सी.

चार जुलाय एकोणीसशे सत्याऐंशी, सकाळ
अमेरिकन स्वातंत्र्याचा उत्सव सर्वत्र
शब्दांची सकाळ
सकाळ पिवळ्याभोर कवितेच्या उत्सवाची.

न्यू जर्सी
नदीच्या पलिकडलं
इवलाल्या रेखीव घरांचं गाव.
झाडाझाडांचं पिवळ्याभोर फुलांचं
दूरवर विटकरी देखण्या घरांचंच.
भल्या पहाटे, एक निरामय गाव.
मी कविता वाचल्या जिवापार
शब्दांना उधळून
नशेत बुडालेले डोके
डोळ्यांतून बेहोशी धून
आपोआप लखडलेत ओळींना फुलांचे
जास्वंदी बहर . . .
माझ्या काबूत हजार डोळे
आणखी टाळ्यांचे गजर
तोंडभरून कौतुकास्तव
भेटले कित्येक जिवाभावाचे
ओळखी अनोळखी चेहरे
भोवती पोरींचे थवे
विचारतात भलभलते कवितेचे
नको ते माझे . . .
आवडत्या कविता
माझे हस्ताक्षर . . .
कुणाला काय द्यावे ?

आख्खं जग माझ्या कवितेत बुडताना
पागल होताना, शब्दांच्या हेराफेरीत
एवढ्या लांबच्या देशात
एक पटक्यावाला म्हातारा
कविता ऐकताना घळघळा रडणारा . . .
माझ्या दुष्काळी कवितेतली प्रार्थना ऐकताना
दुष्काळात कंटाळून मुलाकडे आलेला
एक म्हातारा साक्षात घळघळा रडणारा.

घाऱ्या डोळ्यांच्या पोक्तशा बाईनं
तिकडेही पुन्हा डोळे मागितले.
आणि माझ्या डोळ्यांत डोळे टाकले.
निस्सीम कवितेचे.
(सोबत्यानं थोडं मला सांगितलं सावरून
सुखरूप पोचू जरा अजिंठ्याची वाट धरून)
मी सुखरूप सावरलो तिच्या घाऱ्या डोळ्यांतून
नंतर बेहद्द बेहोशीत आम्ही जगड्व्याळ बहरताना
शब्दांचा झेंडा रुजवून भटकताना . . .
शब्दांच्या मंतरल्या दुनियेत आम्ही
रात्रंदिन भन्नाट, शब्दांचे राजे . . .
ह्या न्यू यॉर्कवाल्या देशात
हिंदळत नव्या शब्दांच्या जल्लोशात
राजे, आम्ही विजयाच्या उत्सवात.

सॅन्फ्रॅन्सिस्कोचं विस्तीर्ण विमानतळ.
पांढऱ्या निळ्या पंखांची
राखी रंगाची विमानं
उतरून येणारी – उडून जाणारी
प्रत्येक मिनिटाला गर्दीतली माणसं

निमूट निसटणारी.
निमूट हलक्या बोलीची लपझप
भंतरलेली आपापल्या गुंगीत
अबोल चालणारी.
गजबजलेली जगभरची माणसं
देशांतरी कुठे उडून जाणारी
प्रत्येक मिनिटाला.

आम्ही तिथेच.
विमान उडून गेलेलं
आमच्याही नकळत
आम्ही सुनसान डोळ्यांनी
शून्याधार पहांत
विमानतळावर उरलेली
माणसं न्याहाळत.
विषण्ण एकेकटे

तीसेक वर्षांचा अमेरिकन पोरगा
मलूल डोळ्यांचा, मलूल मनाचा
बॅगेजेस् आणखी पुनः पुन्हा सांभाळतो
दोन वर्षांच्या मुलाला.
चिमण्या मुलाचे निरागस डोळे
समोरच्या लोकांकडे टकटक पाहात
मागत असतात हातांनी काहीबाही . . .
खुर्च्यांतून रांगत इवलाल्या पावलांनी
निरागस चिमण्यांचे त्यांचे डोळे
अनवाणी . . .
चॉकलेट देताना

त्याला पोचवताना
अमेरिकन डोळ्यांत अथांग पाणी . . .
मलूल माणसाच्या.
मलूल माणसाच्या मनाच्या पडद्याआड
स्वप्नातल्या गोष्टी.
मुलाला जन्म देऊन पसार झालेली
त्याच्या रक्ताची आई, दुसऱ्या सोबत.
कुठं असेल ?
बाळाला वाऱ्यावर
सोडून जाताना
तिला काहीच वाटलं नसेल ?

आणि एका क्षणात
पलिकडल्या दालनात
आत्महत्या करणारी
विमानातून उतरलेली पोक्तशी बाई
पन्नाशीतली.
रूपवंत सुंदर देखण्या देहाची.
घरभर संपत्तीचा ढिगारा सोडून
सोडून स्वतःच्या गगनगर्द इमारती
संसाराची माती कराया निघालेली
पोक्तशी बाई.
फाटलेलं मन सांगणारी बाई
सॅन्फ्रान्सिस्कोच्या विस्तीर्ण विमानतळावर.

माझी थरथर
सोबत्याला हलवून टाकणारी

आम्ही टकटका पाहतोय
एकमेकांच्या डोळ्यात संस्कृतीचा तळ.
हे सगळं साम्राज्य
ऐकताना-पाहताना आम्ही भारतीय
विमानतळ अंगावर कोसळताना
सत्ता-संपत्तीच्या बलदंड देशात
हिरव्या माणसांच्या शोधात.

विमान निघून गेलेलं
आम्ही अबोल एकेकटे
निरर्थक पाहात
एकमेकांच्या डोळ्यात.

सॅन दिएगो
सँड हौजे.
किरमिजी घरांचं
बंगलीवजा लहानसं
पसरलेलं गाव. निळ्या निळ्या पक्ष्यांचं
गोल्डन ब्रिजची गजबज टाळून
समुद्राच्या पार . . .
निळ्या टेकड्यांची कपार.
दूरवर समुद्र निळ्याभोर पाण्याचा
आणि अथांग आभाळ अंगावर झुकलेलं
किरमिजी घरांचं बंगलीवजा गाव
थोडं धुक्यात बुडालेलं. सँड हौजे.
समुद्र निळसर टेकड्यांमधून
वळणवाटांनी, टेकड्यांच्या कुशीत.
दगडांचं लहानसं हॉटेल एकल

वर्दळ नसलेलं.
दोन-पाच टेकड्यांच्या सामुद्रिक पाण्यात
सरोवरासारखा चिंचोळा समुद्र.
रंगांचे तरंग विस्तारत हळुवार
फिकट किरमिजी
हलक्याहलक्यानं
सायंकाळी सूर्याच्या
पिवळसर तांबड्यालाल
सोनगर्भ लाटा पाण्यावर अलवार.
हलणारी होडी . . .
जोडी अनोळखी कबुतरांसारखी
अबोल एकटी, सरकत्या पाण्यावर.
सायंकाळी
बुडत जाणारा सूर्यास्त तांबडा
काळ्याभोर पाण्यावर.
एकादा पक्षी पंख उभारून उडून जाणारा.
तांबड्यालाल पाण्यावर अमलीन शांतता
डोळ्यात डोळे टाकून बसलेली जोडी एकटक
सँड हौजेच्या अमलीन सरोवरात . . .
एक टवटवीत संध्याकाळ तारुण्यातली.
सूर्यास्त तांबडालाल कांतीव सरोवरातून
बदलणारे रंगतरंग
किरमिजी निळ्याभोर तांबड्यालाल पाण्यात.
चांदण्याचं आभाळ उतरणाऱ्या समुद्रात
हळुवार गुंजारव
होडी हळुवार हलणारी . . .
ओठांवर अंगांवर तांबडालाल समुद्र
चांदण्यांत बुडणारा.
समुद्राच्या पाण्यावर पारा पसरणारा.

हॉटेल एकलं.
निमूट डोळ्यांनी.

कॅलिफोर्निया.
विस्तीर्ण सरळसोट रस्ते लांबवर
रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या रांगा
रंगीबेरंगी झाडांच्या रांगा
दूरवर गेलेल्या मैलोगणती
ओळखी अनोळखी.
झुलणारी झाडं गर्दगार सभोवती
हिमवंत वारा
सरत्या हंगामी पावसाळ्यासारखा.
झाडांची फुलांची दरवळ
मनाला उल्हसित करणारी
सबंध रस्ताभर चैतन्य सरोवर
झाडांचे, लदबदल्या देखण्या फुलांचे
हिरवेगार मांडव.
जंगलभर शेतांवर भरगच्च
घनदाट पिकांचे तांडव.
नदीनं डोंगरानं साठलेलं पाणी
तुडुंब नितळशार
पाण्याची सरमिसळ
शेतांवर, डोंगरावर
दूरदूरच्या जंगलांवर
मातीला,
तांबड्यालाल दगडांना
पाण्याचा थरथरता स्पर्श
अमृतासारखा.

लदबदल्या फळांचे झुलणारे हिंदोळे
डोंगरमाथ्यावर, शेतांवर समृद्ध
पिकांचे ताटवे चकित करणारे
शिवारभर, प्रत्येक मैलामैलांवर.

हिरव्या समृद्धीनं
दिपवून टाकणारं
टवटवीत जग
नव्या शास्त्रात बांधलेलं.
डोंगरावर तांबड्यालाल मुरुमाची माती
आमच्या सह्याद्री विंध्याद्रीसारखीच सर्वत्र
अजिंठा कोकणची तांबडीलाल माती . . .
निर्मळ तेजस्वी सूर्यप्रकाश सर्वत्र
हे पाणी हे आकाश
गोदावरी गंगेच्या खोऱ्यातल्या सारखंच . . .
आम्ही कुठं आहोत
शास्त्रांच्या,जेटच्या दुनियेत ?

आख्ख्या दुनियेला धनधान्य पुरविण्याचं
शास्त्र पुरविण्याचं
आव्हान देणारा देश.
पाहिजे त्या संपत्तीचे ढीग पुरविणारा देश.
प्रत्येक दिवसाला
नवं आकाश निर्मिणारा
जेट विमानामधला कॉम्प्युटरचा देश.
उंच उंच मानेनं
समुद्र आणखी आकाश ह्यांना आव्हान देणारा
परंपरा आणि नवता सांधून टाकणारा

नवं तंत्र, शास्त्र देणारा
जादुगिरी करणारा हा बलदंड देश.
शून्यातून उभा राहिलेला सराड
समृद्ध देश.
न्यू यॉर्केचा गगनगूढ
इमारती अहंकार निक्षून सांगणारा.
कॅलिफोर्निया
नव्या शास्त्रांच्या लेण्यांत
दगडात मातीचं पोत शोधण्यात
पाण्याच्या प्रत्येक थेंबाथेंबात
सृष्टी निर्माण करणारा
कॅलिफोर्निया, विश्वामित्राहून भन्नाट, भयंकर.
सत्याहत्तर वर्षांचा झपाटला म्हातारा
तरुणांहूनही तजेलदार
शेतावर झाडं उभारताना
ठिबकच्या थेंबांची मोजदाद करताना
त्याच्या डोळ्यांत
तिथल्या तरण्याबांड शास्त्रज्ञात.
कुठेतरी गॅलिलिओ,
शेताशेतात कार्व्हर शेतीचं सांगताना
समजूतदार साधा माणूसही पाहिला.
समुद्र आणि आकाश
ह्यांना मर्यादा सांगणारा
गर्वगीत गाणारा नवा कोलंबस पाहिला
विसाव्या शतकात.

डोंगरदऱ्यातून रोपं रुजवतांना
पाण्यांचा प्रत्येक थेंब अमृताचा म्हणताना

पाण्याला जपणारा हळुवार माणूस.
मी माणूस पाहिला प्रत्येक ठिकाणी,
समृद्धीच्या सुखाची
आणि लिंकनच्या दुःखाची
यातना समजणारा.
स्वयंपूर्ण मनाचा
निरभ्र जाणता माणूस पाहिला.
कॅलिफोर्निया,
तुझ्या तांबड्यालाल मातीचा
टिळा मी लावला भरदार कपाळी.
अहंकार विसरून.
विसरून मतभेद आणखी देशाचे कप्पे
सगळे इझम् पार बासनात बांधून
इथल्या वाईट गोष्टी तुमच्या समुद्रात सोडून
थरथरत्या हातांनी
तुला सामोरा आलो.
ज्या शास्त्राला ज्ञानाला
कुठं बंध नसतात
ते ओंजळभर तुझ्याजवळ मागायला आलो.
इकडे निघताना
मला चैतन्यमय आनंद
पण मनाच्या कोनाड्यात
विषण्ण दुःखांची लिपझिप लपलेली.
निघताना माझ्या बरड शेतांवर
पाऊस नव्हता . . .

दुष्काळ दुष्काळ पार दुष्काळात आम्ही
शेती करपून गेलेली.
पाण्याशिवाय कुठेच पारावार नाही.

गुजरात सौराष्ट्र
आणि माळवा महाराष्ट्रही
उद्ध्वस्त झालेलं . . .
सगळ्यांचंच आता दिवाळं निघालेलं
कोरड्या दुष्काळात.
कुणाला सांगावं देश मोडून चाललाय.
शेतीभातीचा,हा खेड्यापाड्यांचा देश
उदास होत चाललाय.
आम्हाला काहीच कसं करता येत नाही
ह्या कॉम्प्युटरच्या जगात ?
माझ्या डोळ्यांत
माझ्या देशाच्या
गावाच्या काही उदास आठवणी.
बकाल होत चाललं पांढरंभोर जग
पोखरून टाकणारं
वर्षांपाठोपाठ
इकडे हा असा
कॅलिफोर्निया, मला भोवळ आणणारा.

ऐंशी वर्षांची आई निघताना
ओथंबून होती.
कष्ट केले खूपच
आयुष्यभर राबली शेतांवर आजवर
ती दारिद्र्यात जगली.
भयव्याकुळ दुःखात
तिच्या आयुष्याचं पीठ झालेलं
आता तरी शेतीचे सुखाचे दिवस
संसाराचे थोडे सुखाचे दिवस
पाहू दे म्हणाली.

तिकडचं काहीतरी घेऊन ये म्हणाली
जादूटोण्यांचं, ह्या शेतीच्या जिण्याचं.
एकदा तरी बरडमाळ
हिरवं पाहू दे तुमच्यासाठी . . .
आई घळाघळा रडणारी
माझ्या डोळ्यांत समुद्रासारखी . . .
निघताना कडकडून भेटलेली भावंडं
गणगोत, सगळेच उदास डोळ्यांनी
मी दुष्काळात इकडे निघताना
त्यांना सोडून येताना
त्यांच्या आठवणी.

कॅलिफोनिया
तुझ्या तजेलदार मातीचा
टिळा लागू दे
माझ्या गलथान विचारांना.
माझ्या खेड्यात
माझ्या प्रदेशात
सुखाचा समृद्धीचा दिवा लागू दे
तुला ओंजळभर घेताना
तुझ्याजवळ संपूर्ण विनम्र होताना
मला कुठला संदेह वाटत नाही
मला फक्त तुझ्या शुभेच्छा दे
ह्या समुद्राएवढ्या.
कॅलिफोर्निया,
तिकडे कधी एकदा
पाहुणा म्हणून ये,
पाहुणा म्हणून ये
आणि आमचाही कॅलिफोर्निया

डोळ्यांखाली घे.
कॅलिफोर्निया,
तुला मी दाखवीन उघड्या डोळ्यांनी . . .
थोडा अवधी असू दे.

●

# ६.

# नक्षत्रांमागून नक्षत्रे सरतात



## ६ नक्षत्रामागून नक्षत्रे सरतात

रोहिणी नक्षत्रातले
आथंबले आभाळ.
कोसळले घनघोर.
विजेच्या लखलख उजेडात उडाली
पाखरे शिवारभर.
माती पुण्यशील झाली
म्हणून टिळे लाविले भाळावर;
पेरताना तीर्थ टाकून
जयघोष केला आम्ही तिफणीवर.
मृगाच्या आवर्तात मूस गवसली
माझे मायमाउली.
डोळ्यांना पेलणार नाही
एवढी पुण्याई पदरी आली.
थेंबांच्या चांदण्या

फांदीवर उतराव्या
तशा उतरल्या हारीहारीवर
रानोमाळ उन्मळून
उजवल्या बीजांतले सुगंध दरवळले दूरवर.
मोरपंखी आभाळ
संथ संथ हलक्याने डोळ्यांत उतरले
तेव्हा मी नकळत विसरून गेलो
पुन्हा भवतालचे सगळे.
बाया-माणसांचे.
गजबज कामातले विसरल्या गेले
डोळ्यांवर फक्त हिंदोळ्यासारखे आभाळ तरळले.
दोन राघू आले
आणि मला घेऊन गेले पंखांवर हिरव्या
मेघावी गल्बतात.
मी स्वतःला विसरून पक्ष्यांच्या गाण्यात.
बांधावरल्या बायका हसल्या
खदखदून मोठ्यांदा
'अजून येडगळपण जात नाही खुळ्याचं'
हळूच म्हणाल्या.
मी जागा झालो.
डोक्यातून वीज तडकली बोलणं ऐकून
आई म्हणाली : हा जन्मजात करंटा
मीहि थकली सांगून.
आभाळातले डोळे काढून
मी उठून बसलो थडकून
मलाच शिव्याशाप देत दळभद्री . . .
माझे जन्म-करंटेपण.
अपघाताने आपण या भलत्या दुनियेंत जन्मलो.
आता सुखदुःख वाटू नये चांगल्यावाईटाचं.

जिवापार जतन केलेल्या मातीला
कुरवाळीत बसाव.
पिकाच्या ताटव्यात
झुलत्या हेलकाव्यात
दुःख मलूल व्हावे,
निळ्या नभाळ्यातले
पक्षी उतरते झाडांवर किलबिल
गाफिल जल्लोशात –
माझ्या बाहुपाशात संथ रानभरी झील.
अपघातानं आपण वेडे ठरलो
काही बिघडले नाही.
इथल्या जगताचे
तत्त्वज्ञानच लवकर कळले नाही.
जन्मभर जपायच्या माझ्या गोष्टींशी
हाडवैर इथे.
कशापायी कोरले
सबंध जन्माचे दगडांवर ठसे.
इथल्या मातीत मी राबलो
एका प्राणांतिक प्रेरणेने
जीव टाकला माणसांवर
झाडाझुडुपांवर, उमलत्या चैतन्यावर
वाळल्या झाडांचा दुखवटा
आपल्या देहावर घेतला.
त्यांच्या डोळ्यांतला गलबला
माझ्या डोळ्यांतून गळाला.
हिरवे चैतन्य जागवीत गेले
तसे शिवारभर दीप उजळले
आपोआप झाडांचे हालते हिंदोळे गाणे झाले.
आणि इथेच पुन्हा हिसका बसला गाण्यासाठी.

शिव्याशाप दिले
फालतू ब्राह्मणाऊ गोष्टींसाठी.
सगळे घरदार कातावले.
कबूल केले सगळ्यांसमक्ष
तरी वेडेपण सुटले नाही.
पोटाशी लपवून पुस्तके वाचली चोरून
तरीही करंदीकर जाळला बाबांनी
हुरड्याच्या आगटीत.
तेव्हा डोळ्यांतून पाणी ओघळले
निःशब्द नंतर कित्येक दिवस
पानांच्या राखोंडीत मन जळत राहिले
जळलेली अर्धवट 'त्रिवेणी'चीं पान
नंतर हुडकत फिरलो रानभर.
पावलं धसकटं लागून रक्ताळली
तरीही त्रिवेणीचा बाधर . . .
मी निःशब्द कित्येक दिवस.
माझे डोळे निःशब्द.
कळे उमलू येतांना फासले ग्रीष्माचें जाळे.
कोठडीत गोठल्या काळोखासारखे.

घरदार संसार
गळ्यात सोन्याचे हार
सगळा मोठेपणाचा भपका
तरीहीं जिवाला भार.
मन भिरंगत भिरंगत
दाट पापणीतल्या काळोखात
मिणमिण दिव्याच्या उजेडात
एक अवसेची रात.
मी जगभर पाहिले बाहेर –

सारा काळाकुट्ट काळोख.
मीही झपाटून गेलों काळोखासारखा
गडद-गर्द जगभर.
डोळे उघडून पाहिले घरभर पुन्हा.
झोपलेली बायको.
अर्धवट उघड्या देहाची
तकतकीत अंगाची.
बाळाला पोटाशी लपेटून स्वप्नस्थ.
पाऊल उंबरठ्याजवळ आपोआप थांबले
मलाही मोह झाला बुद्धासारखा.
मायाजाळ पसरले पुन्हा डोळ्यांवर
नकळत माझ्याही –
मी सावरले मला बुद्ध समजून.
आपण म्हणजे युगंधर बुद्ध.
तसेच नाक, तसेच डोळे, उंचीही तशीच.
आयुष्यातले हेलकावे तसेच.
इतक्या विषण्ण क्षणीही मला वाटले
आपल्या कस्पटासमान जिण्याचा
बोधिवृक्ष होणार.
मिणमिण उजेडांतून पुन्हा काळोखाकडे
अनोख्या प्रदेशात निघालेली
दिशाहीन पावले . . .
वेशीबाहेरच्या चक्राकार काळोखात.
डोक्यात एकाएक झन्नाटा.
डोके रक्तबंबाळ. . . लालजर्द –
काळोख कापून जाणारी चिन्‌गारी.
काळोख. काळोख. आणखी काळोख.
अस्पष्ट कुठलीशी जाणीव आणखी
बाबांचे विक्राळ हात.

प्राण विझत चाललेला मिणमिण. . .
आईच्या मांडीवर. . . एकादा स्वर
माणसांच्या झुंबडीत गजबजून गेलेले
माझें काळोखी घर.

सारे सारे झाडून टाकावे
तरीही झाडल्या जात नाही
गोंदून बसलेल्या खुणांचे अस्तित्व
काही केल्या पुसत नाही.
दूरस्थ चुकल्या पायवाटेवर
मीच मला विसरल्या जातो
कुण्या झडलेल्या झाडासारखा
नुस्ता नुस्ता नुस्ता असतों.
मनातल्या सांदीत
खोल खोल कुठे काळोख कापतो
वादळात थरारल्या ज्योतीसारखा.
थेंब ओघळतो.
कधीच पुसता आला नाही
कुणाच्या कोरड्या आशीर्वादांनी
रक्तातील धग विझली नाही.
सगळे दूरात वाहवून दिलें
आणि असाच भरकटत गेलो
चार छिनाल ओळींपाशी
शब्दांसाठी गहाण झालो.
इथले काहीच कळेना.
म्हणून माझे मलाच तपासले कित्येकदा.
सगळे बदलून टाकून आपल्यातले
वस्तीसारखाच झालो कित्येकदा.

पाहिलं :
इतक्या स्वच्छ निसर्गात इतकी बरबटली माणसे
किळस यावी इतके सगळेच नीतीचे व्यवहार
अपार –
माणसाने माणसाला ओळखू नये
इतके सत्तांध जिणे
निष्पर्ण एकल्या झाडाहूनही
केविलवाणे जगणे
अरण्य पेटून पसरावे तसे
दुष्काळ पसरले वर्षापाठोपाठ.
डोळे गोठून गेले
तुडुंब वणव्यात चक्राकार होताना
घरादारातल्या रिकाम्या संसाराचे
लिलाव होताना
वेशीला टांगलेली इभ्रत संथ
थडथडली विझताना.
कोरड्या मातीतल्या ढेकळांसारखा
संसाराचा अस्त
गाठोडे बांधून परदेशी जाणारे
गावचे मार्गस्थ.
फिरून एकटक पाहातात
पाणावल्या डोळ्यांनी धाबळ्यात
बेमुर्वत जगात
कर्जाच्या मशालीत निघालेली वरात.
गदारोळातल्या
उडाल्या धुळीला गुलाल म्हणावे
धूळ म्हणू नये.
मुकाट बघावे.
कुठल्याही विसंगतीची संगती लावू नये.
आपलें शहाणपण वेड्यांत निघाले.

इथल्यांच्या दप्तरात
आपल्याला नाचता येत नाही
गाता येत नाही गावंढळ स्वरात
आगींत बुडत्यांना विझवाया गेलो
तसा मीच भाजलो शरीरभर.
माझे कातडे मखमली तलखीचे
पोळत जाणारे आयुष्यभर.
मीही वेशीला टिळा लाविला
आणि वस्तीतून वनवासी झालो.
रानावनातल्या
पाखरांमधला वारसदार झालो.
स्वच्छ पावसाळी पाण्यात
उन्मत्त हिरवीगार पाती
रुजवून उदविल्या बीजांमधल्या
लखलख ज्योती.
केसरी पानांत.
फुले वेचताना वेडावून गेलो
मातीमधल्या
चंद्रभोर शिल्पांचे चांदणे झालो.
भरदिसा एकदा
नदीच्या पाण्यात नागडे चांदणे
नितळ, निरागस, निःशब्द भवतीचे आसमंत सुने
तिचे न्हाणे
पाण्यात बुडणे
काठावरल्या डहाळीसारखे.
खडकावरल्या झुळझुळगाण्यात
तिच्या स्वरांचीं पाखरे होणे
माझे डोळे विझून गेले तिच्या डोळ्यांवर
हिमशुभ्र देहावर
नदीच्या पाण्यात सरकते आभाळ

तसें तिच्या गुणगुण ओळींवर.
पहिल्यांदा आयुष्यात
दुःखाचे बरबट विसरता आले
तिच्या सहवासात
पहिल्यांदा शब्द प्राणांतून गायिले.
वस्तीबाहेरही
पुन्हा एकदाचा ओरडा झाला
घरच्यादारच्यांनी गद्धेपंचविशीचा उद्धार केला.
ती पोरगी निरागस वेडी . . .
नेस्तनाबूत केली रानातल्या झोपडीत
माझ्या डोळयांत अंगारा ठेवून
तिच्या स्वप्नांची वरात.
कितीही विसरलो
तरी विसरल्या जात नाही श्वासांतले श्वास.
निष्पाप.
निर्मळ पाण्याच्या प्रवाहात
वाहत्या अंगांचे भास.
तिच्यासाठी लिहिल्या गाण्यांवर
लोक बेहद्द नाचले तिकडे
इकडे धिंडवडे निघाले.
करंदीकरांनंतर पुन्हा मलाच जळताना पाहिले
उघड्या डोळ्यांनी.
चितेच्या ज्वालेत माझी भस्मसात शब्दावली
जन्मजात बरबटल्या
पापाच्या वस्तीने आंघोळी केल्यानंतर.
मी डोळे भरून पाहिल्या
राखोंडीत निस्सूर निजलेल्या ओळी
काळ्याठिक्कर. निर्विकार –
मनाच्या काळ्या फत्तरावर

माझ्या शद्बांचे कलेवर.
आभाळ भरून येते पुष्कळ
पहिल्यासारखी बरसात नाही.
नक्षत्रांमागून नक्षत्रें सरतात
तरीही मृद्गंध दरवळत नाही.
गावाकडला गलबला पुसट
ऐकायला येतो डोंगराकडून
अंधाऱ्या रात्री
प्राण कासावीस होतो जुन्या आठवणी स्मरून.

●

REFBK-0026123
REFBK-0026123
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६६८
२६९३०
२२।४।२०
काव्य

# प्रार्थना दयाघना

## ना. धों. महानोर

ना. धों. महानोर यांचे 'रानातल्या कविता', 'वही', 'पावसाळी कविता' आणि 'अजिंठा' असे चार कवितासंग्रह आम्ही आतापर्यंत प्रकाशित केले आहेत.
'प्रार्थना दयाघना' ह्या त्यांच्या नव्या संग्रहात सहा मोठ्या कवितांचा समावेश केला आहे.

'अजिंठा' मधील कवितेचे वेगळेपण सोडल्यास महानोरांची कविता ही प्रामुख्याने निसर्गात रमणारी. निसर्गाची, राना-शेताची, पाखरा-शिवारांची वेगवेगळी रूपे वर्णन करताना महानोरांचे शब्द उचंबळून येतात. गच्च भरलेल्या शेताचे सौंदर्य पाहून झालेला आनंद त्यांच्या कवितेतून दरवेळी प्रतिबिंबित झालेला दिसतो आणि मग 'जोंधळ्याला चांदणे लगडून जावे' किंवा 'ज्वार उभार, गर्भार । हिरव्या पदराला जर । चालताना वारा घुसमटे अंगभर' असे शब्द अगदी सहजपणे येतात.

पण ह्या संग्रहातल्या कविता या सर्वांहून वेगळ्या आहेत. निसर्गातल्या सौंदर्यानुभवाने बेहोश झालेले मन इथे भोवतालच्या परिस्थितीमुळे होरपळले आहे असे दिसेल. निसर्गाचा प्रकोप, ढासळलेली समाजव्यवस्था आणि ही परिस्थिती बदलू न शकणारे शासन यामुळे सर्वस्वी निराश झालेली त्यांची मनःस्थिती या कवितांमधून सतत व्यक्त होते. रानातल्या कवितांमधला हिरवा निसर्ग, नागमोडी पाऊलवाटा, निर्मळ प्रेम, शृंगार, हिरवं गोंदणं, तळ्यातले चांदणे हे सारे लोपून गेल्याचं दुःख त्यात आहे.

पण भोवतालचं हे सुंदर जग नष्ट होत असतानाही दूर समुद्रापलिकडे निर्माण होत असलेल्या सुंदर समृद्ध जगाचे कौतुकही त्यात आहे आणि ते सारे पुन्हा इथे, ह्या मातीत आणून रुजविण्याची इच्छा आहे, आकांक्षा आहे. म्हणूनच प्रार्थना आहे दयाघन आभाळाला. घरट्या घरट्यातल्या सुखसमाधानासाठी, अंधारातून प्रकाशाकडे जाण्यासाठी नव्या युगाचा आरंभ करण्यासाठी आणि माणूस म्हणून उभे राहण्यासाठी.

किंमत रु. ५०.००

(म. ७०७)

पॉप्युलर प्रकाशन

मुखपृष्ठ व आतील चित्रे : व्यंकटेश माडगूळकर